नि.दि.दा.क्र.१५/२०१९ मधील
नि.क्र.७९ खालील आदेश
( राम ..वि.. शासन व इतर )

MHLA050001622019

**नियमीत दिवाणी दावा क्र.१५/२०१९ मधील नि.क्र.७९ खालील आदेश**
**( राम ..वि.. शासन व इतर )**

सदर अर्ज वादीने देऊन नमुद केले की, प्रतिवादी क्र.४ हा नियोजीत राजसारथी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., अहमदपूर यांनी सदस्यांकडून रक्कम जमा करुन घेतल्यावर अहमदपूर येथील सर्वे क्रमांक १२१/1/३ मधील २हेक्टर ४३आर क्षेत्र नोंद खरेदीपत्राच्याआधारे खरेदी केल्यावर प्रत्येक सदस्याला मालकी हक्क दर्शविणारा दाखला दिला होता. सदरचे प्रमाणपत्र प्रतिवादी क्र.४ ने वादीचे साक्षीदार मोहन डांगे यांना दिले होते तसेच भुखंड वाटपाच्या कार्यक्रमाची पत्रीका छापली होती. सदर दोन्ही कागद वि.दी.मु.क्र.1/२०१२ मध्ये आहेत. सदर दोन्ही कागद या प्रकरणी मागवून साक्ष घेणे गरजेचे आहे. सबब, ते कागद मागवावेत अशी विनंती करण्यात आली आहे.

२. प्रतिवादींनी म्हणणे देऊन नमुद केले की, या अर्जासोबत कोणताही कागद दाखल केलेला नसुन वि.दि.मु.क्र.1/२०१२ मधील ज्या कागदांवर पुरावा देणेचा आहे, तो व्यर्थ आहे. म्हणुन अर्ज रद्द करावा अशी विनंती करण्यात आली आहे.

३. विधीज्ञ श्री.मुरकुटे व श्री.शेळके यांचा युक्तिवाद ऐकला.

४. जो कागद शाबीत करावयाचा आहे त्याच्या मुळ प्रती वि.दी.मु.क्र.1/२०१२ मध्ये असल्याने आणि पुराव्याच्या कायद्याच्या दंडकाप्रमाणे मुळ कागद म्हणजेच प्राथमिक पुरावा हा मुळ स्वरुपातच न्यायालयापुढे आणणे गरजेचे असल्याने सदर परवानगी देण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**

**दिनांक : ०४/१०/२०२४.**

**( एस.एन.सरडे )**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.**